## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : १४९७/२०२२**

**तक्रारकर्ता,** श्री.सचिन दिलीप सांबरे,
मु.देहेर्जे, ता.विक्रमगड, जि.पालघर ४०१ ४०५.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (अभिलेख शाखा), जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे, ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्ट नाका, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (अभिलेख शाखा), जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे, ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्ट नाका, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०१.

**तक्रार सुनावणीचा दिनांक** : **११/११/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ६/७/२०२२ | ---- | २६/८/२०२२ | १३/१०/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.९/११/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ११/११/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता ऑनलाइन उपस्थित आहेत. तसेच तत्कालिन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुमेध डी.राऊत, सहायक महसूल अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *आपल्या कार्यालयामार्फत पालघर जिल्हा निर्मिती पूर्वी मौजे देहेर्जे ता.विक्रमगड मधील देहेर्जे हातणे या ग्रामपंचायत हद्दीत दिशा डायरेक्ट रेसोविल्हा रागा व इतर नावांनी सुरु असलेल्या बंगलो प्रोजेक्टस करीता एन.ए. परवाना/कलेक्टर मंजूरी त्याबाबत सविस्तर छायांकित माहिती मिळणेबाबत. सर्वे क्र.५४, ६१, ७८, ७९, ८१, ८४, ८५, ८६, ९२, ९४, ९५, ९६, ९९, १००, १०१, १०२, १०३, १०५, १०६, १११, ११३, ११७, १३८ व इतर माहिती*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१३/१०/२०२२ रोजी, "*अपिलार्थी श्री.सचिन दिलीप सांबरे, यांनी मागणी केलेली माहितीबाबत कागदपत्र उपलब्ध करून दयावेत तद्नंतर अभिलेख कक्षात शोध घेऊन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून यांनी सदर माहिती उपलब्ध झाल्यास अपिलार्थी यांना पुरविणेत यावी. तसेच विक्रमगड तालुक्याचे कामकाज हे अपर जिल्हाधिकारी जव्हार यांचेमार्फत हाताळले जात असल्याने जन माहिती अधिकारी अपर जिल्हाधिकारी पालघर यांना मागणी केलेली माहिती अभिलेखात तपासुन अपिलार्थी यांना पुरविणेबाबत निर्देश दयावे.*" असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, सदरची माहिती ही विक्रमगड तालुका अपर जिल्हाधिकारी जव्हार तसेच तलाठी मौजे देहर्जे यांचेकडे उपलब्ध आहे. सदरचा माहिती अर्ज संबंधित अधिकारी

यांचेपैकी कोणाकडे हस्तांतरित केला आहे का अशी विचारणा केली असता तो हस्तांतरित करण्यात आला नाही असे त्यांनी सांगितले.

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दि.१३/१०/२०२२ रोजीच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांना अभिलेख कक्षात पुरविण्याचे निर्देश दिले होते. हे देखील जन माहिती अधिकारी सांगू शकले नाही. एकूणच याप्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही असे स्पष्ट होते.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसात जलद टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुमेध राऊत, सहायक महसूल अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ६/७/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१५/१२/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ नोव्हेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुमेध राऊत,
सहायक महसूल अधिकारी (अभिलेख शाखा),
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे,
ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर,
कोर्ट नाका, ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०१.